नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026


दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

गुरुवार, दि. १४ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# केरळच्या मुख्यमंत्र्यांचे नाव निश्चित!

**अखेर सस्पेन्स संपला : खरगे-राहुल गांधींच्या बैठकीत शिक्कामोर्तब; गुरुवारी होणार अधिकृत घोषणा**





**मुंबई : (स. गांवकरी)**

केरळच्या मुख्यमंत्रीपदावरुन काँग्रेसमध्ये गेल्या नऊ दिवसांपासून मॅरेथॉन चर्चा झाली. निकालानंतर मुख्यमंत्रीपदाबाबत सुरु झालेला सस्पेन्स अखेर समाप्त झाला आहे. प्रदीर्घ विचारविनिमयानंतर अखेर काँग्रेस गुरुवारी मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवाराची घोषणा करणार आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ आघाडीने दणदणीत विजय मिळवला. पण, सत्ता स्थापनेला विलंब होत असल्याने पक्षात आणि नागरिकांमध्ये देखील नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

केरळमधील सत्ता स्थापनेचा तिढा काही सुटण्याचे नाव घेत नव्हता. दिल्लीत केरळच्या नेत्यांना बोलावून हायकमांडने अनेक बैठका घेतल्या. दरम्यान, बुधवारी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या दिल्लीतील निवासस्थानी राहुल गांधी यांच्याबरोबर खरगे यांची बैठक पार पडली. जवळपास ४० मिनिटे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराचे नाव निश्चित करण्यात आले आहे. पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी याबाबतच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. "बैठक पार पडली असून, गुरुवारी अंतिम निर्णय जाहीर केला जाईल", असे जयराम रमेश म्हणाले.

"काँग्रेसच्या हायकमांडने सर्व चर्चा पूर्ण केल्या आहेत. केरळचा पुढील मुख्यमंत्री कोण होणार, याचा निर्णय उद्या जाहीर केला जाईल," असे जयराम रमेश म्हणाले. ही घोषणा दिल्लीत होणार की केरळमध्ये, असे विचारले असता त्यांनी, "उद्या केरळच्या मुख्यमंत्र्यांबाबतचा निर्णय जाहीर केला जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, केरळ प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष सनी जोसेफ यांनी बुधवारी पक्षांतर्गत चर्चा पूर्ण झाली असून लवकरच निर्णय जाहीर केला जाईल असे संकेत दिले होते.

केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ आघाडीला दोन-तृतीयांश बहुमत मिळाले होते. ४ मे रोजी निकाल जाहीर झाल्यानंतर येथे काँग्रेसचा कोण मुख्यमंत्री होणार याबाबत उत्सुकता पाहायला मिळाली. मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीसाठी इथं के.सी. वेणुगोपाल, व्ही.डी. सतीशन आणि रमेश चेन्नीथला अशी तीन नावं समोर आली. या तिघांना समर्थन असणारे तीन गट देखील उदयास आला, त्यामुळे काँग्रेससमोर पेच निर्माण झाला होता. अखेर काँग्रेसने हा तिढा सोडवला असून, गुरुवारी मुख्यमंत्र्याच्या नावाची घोषणा केली जाणार आहे. ते नाव या तीन पैकी एकाचे असणार की काँग्रेस वेगळा पर्याय निवडणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नागरिकांमध्ये रोष

दरम्यान, सत्ता स्थापनेचा तिढा सुटत नसल्याने राज्यातील नागरिकांनी आता संताप व्यक्त करण्यास सुरुवात केली होती. एवढेच नव्हे तर राहुल गांधींच्या वायनाड मतदारसंघात देखील धुसफूस सुरु झाली, गांधींना इशारा देणारे पोस्टर शहरात झळकू लागले. "मिस्टर राहुल आणि प्रियांका, वायनाड विसरा. तुम्ही पुन्हा येथून विजयी होणार नाही", असा संदेश देणारे पोस्टर वायनाडमध्ये जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयाबाहेर झळकले. याशिवाय आणखी काही पोस्टर समोर आली असून, यात गांधींना इशाराच देण्यात आल्याचे पाहायला मिळाले.

# संशोधन केंद्राला दिले जाणार 'अजितदादा पवार' यांचे नाव



**मुंबई : (स. गांवकरी)**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून नाविन्यपूर्ण अशा देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. देशी गायींच्या मौल्यवान व दुर्मिळ प्रजातींचे जतन, त्यांची दुग्ध क्षमता वाढवणे तसेच शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, या महत्त्वाच्या बाबींवर या केंद्रामार्फत कार्य सुरू आहे. त्यांच्या पश्चात या केंद्रास त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याची व स्मृतीची जपणूक करण्यात आली आहे, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, असे नामकरण करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्या बाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने जारी केला आहे. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या बैठकीत याबाबत ठराव करण्यात आला होता. देशी गायींचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन, सुधारणा आणि संशोधन करण्याच्या उद्देशाने पुणे येथील कृषी महाविद्यालयात देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली होती. या केंद्राच्या बळकटीकरणालाही यापूर्वी शासनाने मान्यता दिली होती.

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांच्या १२२ व्या बैठकीत या केंद्राला "अजितदादा पवार देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र" असे नाव देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, "देशी गायींचे संवर्धन, संशोधन आणि प्रशिक्षणाला चालना देण्यासाठी राज्य शासन सक्षमपणे काम करत आहे. पुण्यातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांचे नाव देण्यात आल्याने या कार्याला आणखी नवी ओळख आणि बळ मिळेल.

## थोडक्यात...

### वर्षा निवासस्थानावर धडकणार मोर्चा

मुंबई (स. गांवकरी) : कोकणातील आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रलंबित मदतीबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी सकाळी अकरा वाजेपर्यंत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे. तरीही या पूर्वीचा अनुभव चांगला नाही. शेतकरी अडीच महिने रस्त्यावरची लढाई लढत आहेत. तरीही सरकारने त्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. त्यामुळे शेतकरी शुक्रवारी, १५ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी धडक देणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिली. महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १५ मे रोजी आयोजित मोर्चाच्या पार्श्वभूमीवर कोकणातील आंबा व काजू बागायतदार शेतकऱ्यांची व संघटनांची मंत्रालयात बैठक झाली. बैठकीला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव, शिवसेनेचे (ठाकरे)विनायक राऊत, काँग्रेसचे भाई जगताप, मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार, जनता दल सेक्युलरचे प्रभाकर नारकर, शेकापचे राजेंद्र कोरडे, मनसेचे प्रवक्ते कुणाल माईनकर, माकपचे अरमाईटी इराणी, राजन राजे आदी उपस्थित होते.

### केवळ ०.१४ टक्के ग्राहकांनाच अधिभार

मुंबई (स. गांवकरी) : छतावर सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या सरसकट सर्व वीज ग्राहकांना अधिभार लागू होणार नसल्याचे स्पष्टीकरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून (महावितरण) देण्यात आले आहे. एकूण वीज ग्राहकांपैकी केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांनाच हा अधिभार लागू झाल्याचे महावितरणने स्पष्ट केले. राज्यामध्ये सरसकट सर्व ग्राहकांवर हा अधिभार लागू होणार असे चित्र निर्माण झाले होते. मात्र ते पूर्णपणे चुकीचे आहे. महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे एकूण ग्राहकांपैकी एक टक्क्यापेक्षा कमी अर्थात केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार (ग्रीड सपोर्ट चार्ज) लागू झाला आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

### एमपीएससी कडून ऑप्टिंग आऊट'चा पर्याय बंद !

पुणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) भरती प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा देण्यात आलेला पर्याय (ऑप्टिंग आऊट) बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पर्यायाचा गैरवापर झाल्यामुळे पर्यायच बंद करण्याची वेळ आली. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी या निर्णयाबाबत परिपत्रकाद्वारे माहिती दिली. एमपीएससीने पदभरतीसाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांतील उमेदवारांना भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (ऑप्टिंग आऊट) २०२२-२३च्या सुमारास लागू करण्याचा निर्णय घेतला होता. या पर्यायाद्वारे पदभरती निवड प्रक्रियेत सुधारणा करण्याचा मूळ उद्देश होता. मात्र, या पर्यायाचा उमेदवारांकडून गैरवापर केला जात असल्याच्या, आर्थिक व्यवहार केले जात असल्याच्या चर्चा होत्या. या पार्श्वभूमीवर, आता हा पर्यायच बंद केला जाणार आहे. एमपीएससीने दिलेल्या माहितीनुसार, आयोगाने भरती प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने ऑप्टिंग आऊट ही संकल्पना लागू केली. या प्रक्रियेद्वारे तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना भरती प्रक्रियेतून स्वेच्छेने बाहेर पडण्याचा पर्याय देण्यात येतो. आयोगाने बुधवारी या संदर्भात बैठक घेऊन या पर्यायासंदर्भात चर्चा केली.

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे ८ जुलैला पंढरीकडे प्रस्थान!

**पिंपरी : (स. गांवकरी)**

आषाढी पायीवारीसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे ८ जुलै रोजी आळंदी येथील मंदिरातून पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. प्रथा, परंपरेनुसार दुपारी तीनच्या सुमारास माऊलींच्या पालखीचे समाधी मंदिरातून प्रस्थान होईल. सुविधेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या हमीपत्रानुसार पुण्यातील मुक्काम भवानी पेठेतच होणार आहे. याबाबतची माहिती पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी दिली. आळंदी देवस्थानच्या भक्त निवास येथे बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेला प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर, ॲड. रोहिणी पवार, भाऊ महाराज फुरसुंगीकर, व्यवस्थापक माऊली वीर आणि दिंडी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावर्षीचा पालखी सोहळा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून ८ जुलै २०२६ रोजी दुपारी लाखो भाविकांच्या उपस्थितीत




माऊलींच्या पालखीचे आळंदी मंदिरातून पंढरपूरकडे प्रस्थान होईल. त्यानंतर ९ आणि १० जुलै २०२६ रोजी सोहळा पुण्यातील भवानी पेठ येथील पालखी विठोबा मंदिर येथे दोन दिवसांच्या मुक्कामासाठी विसावेल. या निर्णयामुळे गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या पत्रव्यवहार आणि बैठकांना आता पूर्णविराम मिळाला आहे. पुण्यातील मुक्कामाच्या ठिकाणी असलेल्या जागेची टंचाई आणि नागरी सुविधांच्या अभावामुळे मुक्कामाची जागा बदलण्याबाबत चर्चा सुरू होती. भवानी पेठेतील विठोबा मंदिर येथील मुक्कामाच्या ठिकाणी सुविधा देण्याबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी हमी दिली आहे.

# 'नीट' प्रश्नपत्रिकाफुटीचे धागेदोरे पुण्यापर्यंत

## बिबवेवाडीतील महिलेसह अभियांत्रिकीतील विद्यार्थी ताब्यात

**पुणे : (स. गांवकरी)**

'नीट' परीक्षेची प्रश्नपत्रिकाफुटीचे धागेदोरे पुण्यापर्यंत पोहोचले आहे. पुणे पोलिसांच्या पथकाने बिबवेवाडीतील सुखसागरनगर भागातून एका ब्यूटी पार्लरचालक महिलेसह अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्याला बुधवारी ताब्यात घेतले. 'या प्रकरणात ताब्यात घेण्यात आलेल्या महिलेला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) ताब्यात देण्यात आले आहे. अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्याकडे चौकशी सुरू आहे,' अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. "नीट' प्रश्नपत्रिका फूट प्रकरणाची व्याप्ती देशभरात असून ,सीबीआयकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. सीबीआयच्या पथकाने पुणे पोलिसांना या बाबत काही सूचना दिल्या होत्या. त्यानंतर पोलिसांनी कारवाई केली,' असे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक मासाळ यांनी सांगितले.



सीबीआयच्या पथकाने अहिल्यानगरमधील राहुरी परिसरातून धनंजय लोखंडे (वय २६) याला ताब्यात घेतले. त्यानंतर लोखंडे यांच्या संपर्कात बिबवेवाडीतील ब्यूटी पार्लरचालक महिला मनीषा वाघमारे आणि अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थी असल्याची माहिती मिळाली. विद्यार्थ्यांचा शोध घेणे, त्यांच्याकडून पैसे घेऊन ते संबंधित आरोपींविरुद्ध पोहोचविण्यात वाघमारे आणि संबंधित विद्यार्थी सामील असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली.

तपासात लोखंडे हा मुख्य संशयित आरोपी असल्याची माहिती मिळाली. गेली चार ते पाच वर्षे तो पुण्यातील वाघोली भागात वास्तव्य करत होता. मंगळवारी पुणे पोलिसांनी त्याचा पत्ता शोधून काढला. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच तो पसार झाला. मध्यरात्री त्याला राहुरी परिसरातून सीबीआयच्या नाशिक पथकाने ताब्यात घेतले. तपासात लोखंडे हा मनीषा वाघमारे (वय ४७, रा. सुखसागरनगर, बिबवेवाडी) हिच्या संपर्कात असल्याची माहिती मिळाली. बुधवारी सकाळी तिला ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीनंतर तिला दुपारी सीबीआयच्या ताब्यात देण्यात आले. वाघमारे हिचे पती दंतवैद्यक तज्ज्ञ आहेत. ती गेल्या तीन वर्षांपासून लोखंडे याच्या संपर्कात होती. प्राथमिक चौकशीत ती विद्यार्थ्यांना लोखंडे याच्याकडे घेऊन जायची, असे समोर आले आहे.


सीबीआयच्या पथकाकडून मोबाइल संभाषण, बँक खात्यातील व्यवहार तपासण्यात येत आहे. या प्रकरणात आणखी कोण सामील आहेत का, या दृष्टीने तपास सुरू आहे. वाघमारेच्या बँक खात्यात पैसे जमा झाल्याचे दिसले आहे.

### मांजरीतून विद्यार्थी ताब्यात

हडपसर परिसरातील मांजरी भागातून शेषराव सोळंकी या अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्याला बुधवारी दुपारी ताब्यात घेण्यात आले. तो एका नामांकित विद्यालयात सायबर सुरक्षा अभ्यासक्रम करत आहे. विद्यार्थ्यांचा शोध घेण्याची जबाबदारी त्याच्याकडे सोपविण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. लोखंडे याने 'नीट' परीक्षेपूर्वी तीन ते चार दिवस आधी प्रश्नपत्रिका येणार असल्याची माहिती सोळंकी याला दिली होती.

# अण्णाद्रमुकमध्ये उभी फूट!

**मुख्यमंत्री जोसेफ विजय यांना मदत करणाऱ्या २५ आमदारांची हकालपट्टी; अपात्रतेची मागणी**



**मुंबई : (स. गांवकरी)**


मतदान झाले, निकाल लागला, नव्या सरकारचा शपथविधीही झाला, विश्वासदर्शक ठरावात मुख्यमंत्री विजय पास झाले तरी देखील तमिळनाडूमधील नाट्यमय राजकीय घडामोडी थांबण्याचे नाव घेत नाहीत. मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या विश्वासदर्शक ठरावादरम्यान अण्णाद्रमुकच्या (एआयएडीएमके) एका गटाने टीव्हीकेला मतदान केल्यानंतर पक्षाने आता त्यांच्यावर कारवाई केली आहे. एआयएडीएमकेचे सरचिटणीस एडप्पाडी के पलानीस्वामी यांनी एस.पी वेलुमणी, सी.व्ही षण्मुगम आणि सी. विजयभास्कर यांची पदांवरून हकालपट्टी करण्यात आली. नव्याने स्थापन झालेल्या जोसेफ विजय यांच्या सरकारचा विधानसभेत विश्वासदर्शक ठराव पार पडला. यावेळी अण्णाद्रमुक पक्षाच्या नेत्यांनी पक्षाचा आदेश झुगारून टीव्हीके (तमिळगा वेत्री कळघम) ला मतदान केले. २५ आमदारांनी पक्षाचा व्हीप झुगारुन विजय यांच्या बाजूने मतदान केले. पक्ष आदेशाच्याविरोधात मतदान केल्याने अण्णाद्रमुक पक्षाने या नेत्यांची हकालपट्टी केली आहे. यात नथम आर विश्वनाथन यांचाही समावेश आहे. पलानीस्वामी यांनी २५ आमदारांची पदे काढून घेत त्यांच्या जागी नवीन जिल्हा सचिवांची नियुक्ती केली आहे. याप्रकरणी अण्णाद्रमुक पक्षाच्या वतीने माहिती देण्याता आली आहे. "२५ आमदारांनी पक्षादेशाच्या विरोधात मतदान केल्यामुळे, पक्षांतरबंदी कायद्यानुसार त्यांनी पदं गमावली आहेत. आम्ही आज त्यांच्या अपात्रतेची मागणी करणारी याचिका सादर केली आहे. पक्षाने जारी केलेल्या पक्षादेशाच्या विरोधात त्यांनी मतदान केल्याने, पक्षांतरबंदी कायदा लागू होतो," असे अण्णाद्रमुकने चेन्नईमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली. याप्रकरणी तक्रार दाखल केल्याची माहिती देखील यावेळी देण्यात आली. २३४ सदस्यसंख्या असलेल्या तमिळनाडू विधानसभेत विजय यांना ११८ चे बहुमत सिद्ध करायचे होते. यापूर्वी त्यांनी राज्यपाल आर्लेकर यांच्याकडे १२१ आमदारांच्या समर्थनाचे पत्र दिले होते. पण, विश्वासदर्शक ठरावात विजय यांना १४४ आमदारांनी पाठिंबा दिला. यात टीव्हीकेचे स्वतःचे आमदार आणि काँग्रेस, सीपीआय, सीपीआय(एम), व्हीसीके, आययूएमएल यांच्या आमदारांचा समावेश होता. तसेच, अण्णाद्रमुक यांच्या २५ आमदारांनी विजय यांच्या टीव्हीके पक्षाच्या बाजूने मतदान केले. यावेळी पाच आमदारांनी मतदानात भाग घेतला नाही.

### पोटनिवडणुकीचा इशारा

सी. व्ही. षण्मुगम, एस. पी. वेलुमणी, सी. विजयभास्कर आणि इतरांना पक्षातून कार्यमुक्त करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. पक्षांतरबंदी कायद्यानुसार, बंडखोरांना आमदार म्हणूनही अपात्र ठरवले जाऊ शकते, त्यामुळे रिक्त होणाऱ्या सर्व जागांवर पोटनिवडणूक घेण्याची वेळ येऊ शकते, असे अण्णाद्रमुक पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले.

# 'नीट' पेपरफुटीप्रकरणी धनंजय लोखंडेला अटक

**दिल्लीला नेण्यासाठी दोन दिवसांची कोठडी**



**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

'नीट' परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात अहिल्यानगर पोलिसांनी राहुरी तालुक्यातील धनंजय निवृत्ती लोखंडे (वय ३०) याला ताब्यात घेऊन केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) पथकाच्या हवाली केले. दिल्ली येथे नेण्यासाठी (ट्रान्सिट कस्टडी) लोखंडे याला आज, बुधवारी सायंकाळी न्यायालयापुढे हजर करण्यात आले. जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एम. पाटील यांनी दोन दिवसांची कोठडी मंजूर केली. पेपरफुटी संदर्भात धनंजय लोखंडे याला ताब्यात घेऊन सीबीआयच्या स्वाधीन केल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिली. दरम्यान लोखंडे याच्यासमवेत आणखी दोन तरुणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते.

मात्र त्यांना न्यायालयापुढे हजर करण्यात आलेले नाही. सीबीआयच्या मुंबईतील पथकाचे उपअधीक्षक सत्यप्रकाश यांच्या पथकाने लोखंडे याला न्यायालयापुढे हजर केले. सीबीआय पथकाने न्यायालयापुढे सादर केलेल्या अहवालात लोखंडे याला सकाळी १० वा. अटक केल्याचे नमूद केले आहे. न्यायालयापुढे जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, सरकारी वकील मंगेश दिवाणे व सीबीआयचे वकील प्रकाश सोनी (पुणे) यांनी काम पाहिले.

# देश आर्थिक वादळाच्या उंबरठ्यावर? मोदींच्या आवाहनानंतर देशभर चर्चा

(स. गांवकरी)

- महागाई, तेल, डॉलर आणि युद्धामुळे भारतासमोर मोठं आव्हान!
- “अनावश्यक खर्च टाळा, इंधन वाचवा, सार्वजनिक वाहतूक वापरा” — पंतप्रधानांच्या संदेशामागे आर्थिक संकटाची चाहूल?
- पश्चिम आशियातील युद्ध, वाढत्या तेलाच्या किंमती, घसरता रुपया आणि परकीय चलनसाठ्यावर दबाव; अर्थतज्ज्ञांकडून गंभीर इशारे!






## डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना केलेल्या काटकसरीच्या आवाहनामुळे देशभरात आर्थिक परिस्थितीबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. “इंधन वाचवा”, “वर्क फ्रॉम होमचा वापर करा”, “अनावश्यक परदेश प्रवास टाळा”, “सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य द्या”, “सोने खरेदी कमी करा” असे संदेश देत केंद्र सरकारने जणू काही आगामी आर्थिक संकटासाठी नागरिकांना मानसिकदृष्ट्या तयार करण्याचा प्रयत्न सुरू केल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे, हे आवाहन अशा काळात करण्यात आले आहे, जेव्हा जगभरात युद्धजन्य परिस्थिती तीव्र होत चालली आहे. पश्चिम आशियात वाढत असलेला संघर्ष, अमेरिकेचे निर्बंध, इराण युद्ध, रशिया-युक्रेन युद्धाचे दीर्घकालीन परिणाम, तेलाच्या किंमतीतील प्रचंड चढउतार आणि जागतिक बाजारातील अस्थिरता यामुळे भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते, पंतप्रधान मोदी यांनी केलेले आवाहन हे केवळ जनजागृती नसून, देशाच्या अर्थव्यवस्थेवरील वाढत्या दबावाचा अप्रत्यक्ष इशारा आहे. भारताच्या इतिहासात नागरिकांना काटकसरीचे आवाहन करण्याची ही पहिली वेळ नाही. 1965 मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध आणि अन्नधान्याच्या टंचाईच्या काळात तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी देशवासीयांना आठवड्यातून एक दिवस उपवास करण्याचे आवाहन केले होते. “जय जवान, जय किसान” या घोषणेच्या माध्यमातून त्यांनी देशाला आत्मनिर्भरतेचा संदेश दिला होता. त्यावेळी देश अन्नधान्याच्या संकटातून जात होता. अमेरिकेकडून गहू आयात करावा लागत होता. परिस्थिती इतकी गंभीर होती की सरकारने नागरिकांना स्वेच्छेने उपवास करण्याची विनंती केली होती. अनेक कुटुंबांनी सोमवारचा उपवास सुरू केला होता.

यानंतर 1991 मध्ये भारताला सर्वात मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. परकीय चलनसाठा इतका कमी झाला होता की देशाकडे फक्त काही दिवसांच्या आयातीपुरते डॉलर उरले होते. भारताला आपला सोन्याचा साठा गहाण ठेवण्याची वेळ आली होती. त्या काळात तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी मोठ्या आर्थिक सुधारणा राबवत देशाला संकटातून बाहेर काढले.

आज परिस्थिती वेगळी असली तरी चिंता निर्माण करणारे अनेक संकेत पुन्हा समोर येऊ लागले आहेत. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा कच्चे तेल आयात करणारा देश आहे. देशाच्या ऊर्जेच्या गरजांपैकी जवळपास 85 टक्के गरजा आयातीवर अवलंबून आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किंमती वाढल्या की भारताच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. फेब्रुवारी महिन्यात कच्च्या तेलाची किंमत 78 डॉलर प्रति बॅरल होती. मात्र इराणवरील हल्ल्यानंतर आणि पश्चिम आशियातील संघर्ष वाढल्यानंतर तेलाच्या किंमती अचानक 126 डॉलर प्रति बॅरलपर्यंत पोहोचल्या. सध्या त्या 105 ते 110 डॉलर दरम्यान आहेत. गेल्या आर्थिक वर्षात भारताने कच्च्या तेलाच्या आयातीवर सुमारे 176 अब्ज डॉलर खर्च केले होते. आता तेल महागल्याने हा खर्च आणखी वाढणार असल्याचे स्पष्ट संकेत आहेत.

तेलाच्या किंमती वाढल्यावर केवळ पेट्रोल-डिझेल महाग होत नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. कारण —

वाहतूक खर्च वाढतो.
शेतीसाठी लागणारा खर्च वाढतो.
उद्योगांचे उत्पादन महाग होते.
अन्नधान्य महाग होते.
विमान सेवा आणि लॉजिस्टिक क्षेत्रावर ताण येतो.
महागाई वेगाने वाढते.
म्हणजेच तेल महागलं की देशातील प्रत्येक नागरिकावर त्याचा थेट परिणाम होतो.

आंतरराष्ट्रीय बाजारात डॉलर मजबूत होत असताना भारतीय रुपया सातत्याने कमजोर होत आहे. काही महिन्यांपूर्वी डॉलरच्या तुलनेत 91 रुपयांवर असलेला रुपया आता 95 रुपयांच्या खाली गेला आहे.

अनेक अर्थतज्ज्ञांच्या मते, परिस्थिती अशीच राहिली तर डॉलर 100 रुपयांच्या पातळीवर पोहोचू शकतो.

रुपया कमजोर झाला की भारताला प्रत्येक आयातीसाठी अधिक पैसे द्यावे लागतात. त्यामुळे तेल, इलेक्ट्रॉनिक्स, औषधे, यंत्रसामग्री, रसायने यांसारख्या वस्तूंच्या किंमती वाढतात.

याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या खिशावर होतो.

पेट्रोल-डिझेल दर वाढतात.
गॅस सिलिंडर महाग होतो.
मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू महाग होतात.
औषधांचे दर वाढतात.
घरगुती खर्च वाढतो.

यामुळे महागाई नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

परकीय चलनसाठ्यावर प्रचंड दबाव : भारताकडे सध्या जवळपास 700 अब्ज डॉलरचा परकीय चलनसाठा आहे. वरकरणी हा साठा मोठा वाटत असला तरी अर्थतज्ज्ञांच्या मते परिस्थिती तितकी सुरक्षित नाही.

कारण भारताची आयात निर्यातीपेक्षा खूपच जास्त आहे.

गेल्या आर्थिक वर्षात भारताचा एकूण आयात खर्च 775 अब्ज डॉलर होता. त्यामध्ये —

175 अब्ज डॉलर तेलावर.
116 अब्ज डॉलर इलेक्ट्रॉनिक्सवर.
74 अब्ज डॉलर सोन्यावर खर्च झाले.
ही तीन क्षेत्रे भारताच्या डॉलर साठ्यावर सर्वाधिक दबाव आणत आहेत.

सोन्यामुळेही वाढतेय आर्थिक ओझं : भारतीय संस्कृतीमध्ये सोन्याला विशेष महत्त्व आहे. लग्नसमारंभ, सण-उत्सव आणि गुंतवणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी केले जाते. मात्र भारतात वापरले जाणारे बहुतांश सोने आयात केले जाते. म्हणजेच त्यासाठी डॉलरमध्ये पैसे द्यावे लागतात. यामुळे देशाचा परकीय चलनसाठा कमी होतो.

अर्थतज्ज्ञांच्या मते, सरकार लवकरच सोन्यावर आयात शुल्क वाढवू शकते. यापूर्वी सोन्यावर 15 टक्के शुल्क होते. नंतर ते 6 टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले. आता पुन्हा ते वाढवले जाण्याची शक्यता आहे.

आखाती देशांतील भारतीयांवरही संकट : पश्चिम आशियात जवळपास 90 लाख भारतीय काम करतात. हे भारतीय दरवर्षी मोठ्या प्रमाणावर डॉलर भारतात पाठवतात. हा पैसा भारतासाठी महत्त्वाचा परकीय चलन स्रोत आहे.

मात्र युद्धामुळे परिस्थिती बिघडल्यास —

रोजगार कमी होऊ शकतात.
उद्योग बंद पडू शकतात.
भारतीयांना मायदेशी परतावे लागू शकते.
भारतात येणारा डॉलर कमी होऊ शकतो.
याचा परिणाम भारताच्या पेमेंट बॅलन्सवर होऊ शकतो.

शेअर बाजारात घबराट : पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनानंतर शेअर बाजारात सलग घसरण दिसून आली. विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून पैसा काढण्यास सुरुवात केल्याचे संकेत मिळत आहेत.

विशेषतः —
विमान कंपन्या.
तेल कंपन्या.
ऑटोमोबाईल क्षेत्र.
पर्यटन उद्योग.
आयात-आधारित कंपन्या.
यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण दिसून आली. सरकार कोणती पावलं उचलू शकतं?

अर्थतज्ज्ञांच्या मते परिस्थिती आणखी गंभीर झाली तर केंद्र सरकार पुढील कठोर निर्णय घेऊ शकते —

इंधन दरवाढ.
पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढू शकतात.
सोन्यावर अतिरिक्त कर.
सोन्याची आयात कमी करण्यासाठी शुल्क वाढवले जाऊ शकते.
अनावश्यक आयातीवर निर्बंध.
लक्झरी वस्तूंवर निर्बंध आणले जाऊ शकतात.
सरकारी खर्चात कपात.
मोठ्या प्रकल्पांच्या खर्चावर नियंत्रण आणले जाऊ शकते.

ऊर्जा बचत मोहीम : वीज आणि इंधन बचतीसाठी देशव्यापी मोहिम राबवली जाऊ शकते.

सामान्य नागरिकांवर काय परिणाम होणार?

जर जागतिक परिस्थिती आणखी बिघडली तर त्याचा सर्वाधिक फटका सामान्य माणसाला बसू शकतो.

संभाव्य परिणाम:
महागाई वाढ.
पेट्रोल-डिझेल दरवाढ.
घरगुती खर्च वाढ.
EMI महाग होण्याची शक्यता.
रोजगार बाजारावर परिणाम.
उद्योगांमध्ये मंदी.
बांधकाम आणि वाहन उद्योगात अडचणी.

“संकट येण्यापूर्वी सावध राहा” — सरकारचा अप्रत्यक्ष संदेश?

अर्थतज्ज्ञांच्या मते, पंतप्रधान मोदी यांचे आवाहन हे घाबरवण्यासाठी नाही, तर नागरिकांना आगामी परिस्थितीसाठी तयार करण्याचा प्रयत्न आहे.

कारण भारताची अर्थव्यवस्था मोठी असली तरी ती अजूनही तेल आयात, डॉलर आणि जागतिक परिस्थितीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.

जर पश्चिम आशियातील संघर्ष आणखी वाढला, तेल 130-140 डॉलरपर्यंत गेले आणि रुपया अधिक घसरला तर भारतासमोर मोठे आर्थिक आव्हान उभे राहू शकते.

• • •

### भारत पुन्हा संकटातून सावरू शकेल?

भारताने यापूर्वी अनेक संकटांचा सामना केला आहे. 1991 चे आर्थिक संकट, जागतिक मंदी, कोरोना महामारी — प्रत्येक वेळी भारताने नव्या धोरणांच्या जोरावर पुनरागमन केले. मात्र सध्याची परिस्थिती अधिक गुंतागुंतीची मानली जात आहे. कारण एका बाजूला युद्धजन्य वातावरण आहे, दुसऱ्या बाजूला जागतिक अर्थव्यवस्थेतील मंदी आहे आणि तिसऱ्या बाजूला देशांतर्गत महागाईचा दबाव आहे. यामुळेच पंतप्रधान मोदी यांनी दिलेला काटकसरीचा संदेश हा केवळ साधा सल्ला नसून “आर्थिक वादळ येण्यापूर्वी सज्ज व्हा” असा गंभीर इशारा मानला जात आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## आरोग्यदूत डॉ. मारुती भांडकोळी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार!

अकोले (स. गांवकरी) : अकोले शहरातील नामांकित राजा हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन संचलित संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा आरोग्य सेवेतील आरोग्यदूत डॉ. मारुती भांडकोळी यांचा वाढदिवसानिमित्त साईबाबांची मूर्ती, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांचा सत्कार करून पुढील सामाजिक व आरोग्य सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. मारुती भांडकोळी यांनी आरोग्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले. समाजातील गरजू रुग्णांना सातत्याने मदतीचा हात देत आरोग्य सेवा जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.




## शिवाजीराव कपाळे यांना पसायदान पुरस्कार प्रदान

राहुरी (स. गांवकरी) : आनंदवन सेवाभावी संस्था यांच्या वतीने दिला जाणारा पसायदान पुरस्कार साई आदर्श मल्टीस्टेटचे संस्थापक शिवाजीराव कपाळे यांना प्रदान करण्यात आला. उद्धव महाराज मंडलिक, सुनीताताई गडाख, पंढरीनाथ महाराज तांदळे, सूर्यकांत नेटके, डॉ. संजय सोनवणे, उषा दीदी व्यासपीठावर उपस्थित होते..साई आदर्शच्या माध्यमातून आदर्श व्यवहारामुळे सहकार क्षेत्रामध्ये साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे यांनी आपला वेगळा ठसा व अस्तित्व जिल्ह्यामध्ये निर्माण करून यशाच्या शिखराला गवसणी घातली आहे. त्यामुळे कपाळे यांना हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले पारदर्शक व आर्थिक व्यवहारातून नगर जिल्ह्यामध्ये हजारो खातेदारांचा विश्वास संपादन करणारी साई आदर्श सहकारी क्षेत्रात अल्पावधीत आपल्या कर्तुत्वाचा बळावर नावलौकिकास पात्र ठरलेली आहे अर्थकारणा बरोबरच सामाजिक कामातही संस्था आघाडीवर असल्याने या संस्थेचे प्रशासन चोख पद्धतीने बजावणारे चेअरमन कपाळे यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्कारानंतर कपाळे म्हणाले की सहकार चळवळ ही ग्रामीण भागात आर्थिक नाडी म्हणून ओळखली जाते ही चळवळ आणखी वाढावी निकोप व्हावी अशी अपेक्षा आहे. या प्रसंगी सुदामराव तागड,डॉ. बाबासाहेब शिरसाठ,शिवासेठ बाफना,बडे मामा,खाडे महाराज,पत्रकार सुखदेव फुलारी,विनायक दरंदले,संजय गर्जे ,गणेश डोंगरे,भाऊसाहेब ठोसर ,डॉ रामनाथ बडे आदी उपस्थित होते.

# लोहा शहर व परिसरातील लॉजिंग व्यवसायावर नागरिकांचे प्रश्नचिन्ह

लोहा : (स. गांवकरी)



राष्ट्रीय महामार्ग ३६१ मुळे लोहा शहराचा मोठ्या वेगाने विस्तार होत असून दळणवळणाच्या सुविधा वाढल्याने शहराचे महत्त्व वाढले आहे. परिणामी, नांदेड, पालम, गंगाखेड, कंधार, मुखेड आदी तालुक्यांतून दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची व प्रवाशांची शहरात ये-जा वाढली आहे. या वाढत्या वर्दळीचा फायदा घेत शहरात आणि महामार्गालगत हॉटेल व लॉजिंग व्यवसायात लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र, यातील काही लॉजिंगच्या आडून संशयास्पद आणि अनैतिक हालचाली सुरू असल्याच्या चर्चेने नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष न दिल्यास शहराचे सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याची भीती निर्माण झाली आहे. सध्या लोहा शहर व परिसरातील काही लॉजिंगमध्ये छुप्या पद्धतीने अनुचित प्रकार सुरू असल्याचा थेट आरोप सुजाण नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, या उघडपणे सुरू असलेल्या प्रकारांकडे स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सोयीस्करपणे दुर्लक्ष करत असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये बळावली आहे. एखादी मोठी किंवा अनुचित घटना घडल्यानंतरच पोलीस आणि प्रशासन झोपेतून जागे होणार का? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.या वाढत्या संशयास्पद प्रकारांमुळे नागरिकांना १९९९ च्या दशकातील आठवणी ताज्या झाल्या आहेत. सन १९९९ मध्ये लोहा शहरात अशाच प्रकारे कथित वेश्या व्यवसायाने डोके वर काढले होते. त्यावेळी तत्कालीन शिवसेना आमदार रोहिदास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली या प्रकाराविरोधात मोठे जनआंदोलन उभारण्यात आले होते. शिवसेना कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी पुढाकार घेत रस्त्यावर उतरून हे गैरप्रकार कायमचे बंद पाडले होते.

आज पुन्हा एकदा तशीच काहीशी परिस्थिती निर्माण होत असल्याने, त्या जुन्या संघर्षाची आठवण नागरिक काढत आहेत. शहरातील शांतता आणि पवित्र सामाजिक वातावरण अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे.


# सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या पोलवरून कुटुंबावर जीवघेणा हल्ला

### नगर तालुक्यातील घटना

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देऊळगाव सिद्धी येथे सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या पोलवरून झालेल्या वादातून एका कुटुंबावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. या घटनेत फिर्यादीसह त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना लाकडी दांडके, केबल आणि लोखंडी शस्त्रांनी मारहाण करण्यात आली असून, सोन्याचे दागिने आणि शेतीची अवजारे जबरदस्तीने पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी फिर्यादी प्रसाद बापूराव पडोळकर यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या घटनेतील आरोपी रोमा पडोळकर, तुषार पडोळकर, सोन्याबापू पडोळकर, गणेश पडोळकर, दादा पडोळकर, रावसाहेब पडोळकर, अलका पडोळकर, सविता पडोळकर, पुष्पा पडोळकर, अर्चना पडोळकर, रोहिणी पडोळकर आणि भारत पडोळकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादीच्या घरामागील सीसीटीव्ही पोल हलत असल्याचे समजताच ते पाहण्यासाठी गेले होते. त्यावेळी सर्व आरोपींनी संगनमत करून गैरकायद्याची मंडळी जमवून तिथे तोडफोड सुरू केली. आरोपींनी ट्रॅक्टरच्या सहाय्याने कल्टीव्हेटर आणि रोटाव्हेटर यांसारखी शेतीची अवजारे बळजबरीने नेली. यावेळी फिर्यादीच्या कुटुंबातील महिला सदस्य भांडण सोडवण्यासाठी गेल्या असता, आरोपींनी त्यांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून त्यांना अमानुष मारहाण केली. जीव वाचवण्यासाठी फिर्यादी बाथरूममध्ये लपले असता, आरोपींनी तिथेही जाऊन त्यांना लोखंडी शस्त्रांनी जखमी केले.

# सॅमसंगकडून ‘उद्याचा मार्ग शोधा’ उपक्रमाच्या पाचव्या पर्वाची घोषणा




### विजेत्यांसाठी २ कोटी रुपयांचे अनुदान

मुंबई : (स. गांवकरी)

सॅमसंग ने आपल्या प्रमुख नवोन्मेष आणि शिक्षण उपक्रम ‘उद्याचा मार्ग शोधा’च्या पाचव्या पर्वाची घोषणा केली आहे. भारतातील तरुण नवोन्मेषकांना वास्तवातील सामाजिक समस्यांवर तंत्रज्ञानाधारित उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यंदा विजेत्या संघांसाठीच्या अनुदानाची रक्कम दुप्पट करून तब्बल २ कोटी रुपये करण्यात आली आहे. भारतामध्ये कंपनीची ३० वर्षे पूर्ण होत असताना हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित जीवनशैली, आरोग्य व शिक्षण, पर्यावरणीय शाश्वतता तसेच क्रीडा व तंत्रज्ञान या चार प्रमुख विषयांवर १४ ते २२ वयोगटातील विद्यार्थी आपले अभिनव प्रकल्प सादर करू शकतील. यंदाच्या पर्वातील सर्वोत्तम चार विजयी संघांना भारतीय तंत्रज्ञान संस्था, दिल्ली येथे उद्योजकीय संवर्धन सहाय्यासह २ कोटी रुपयांचे अनुदान दिले जाईल. तसेच सर्वोत्तम २० संघांना २० लाख रुपये, तर सर्वोत्तम ४० संघांना ८ लाख रुपये आणि सॅमसंगची उपकरणे दिली जाणार आहेत. सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नमुना निर्मिती सहाय्य, तज्ज्ञ मार्गदर्शन, गुंतवणूकदारांशी संवाद, निवासी प्रशिक्षण शिबिरे तसेच देशभरातील १०० शहरांमध्ये रचनात्मक विचार कार्यशाळांचा लाभ मिळणार आहे. याशिवाय दोन लाख चाळीस हजार तासांहून अधिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# अंगणवाडी शिक्षिका सौ. सिमा आनंद मोहिते यांचे कार्य कौतुकास्पद

खोडद : (स. गांवकरी)



धामारी तालुका शिरूर येथील अंगणवाडी शिक्षिका सौ. सिमा मोहिते यांना नुकतेच वाई सातारा येथील उद्योग उत्कर्ष संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

धामारी तालुका शिरूर येथील अंगणवाडी शिक्षिका सौ. सिमा आनंद मोहिते या सन २००६ पासून अंगणवाडी शिक्षका म्हणून कार्यरत आहेत. अंगणवाडी शिक्षिका म्हणून कार्यरत असताना गरोदर महिलांचा, बालकांचा आणि पालकांचा निकटचा त्यांचा संबंध आला. त्यातून त्यांनी आपलेपणाच्या भावनेने "आजचा बालक हा भविष्यातील देशाचा आदर्श नागरिक आहे"!.

'आवडीनुसार त्यांना प्रोत्साहन देऊन' त्यांच्याशी प्रेमाने वागल्यास त्यांच्या चेहऱ्यावरती सतत हसू असते."! "बालकांचे संगोपन शिक्षण , प्रेम, संयम आणि संस्कारावरती आधारित असते." 'त्यामुळे लहान मुलांना ओरडण्यापेक्षा, त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देऊन त्यांना चांगल्या सवयी लावणे"! हीच अंगणवाडी शिक्षिकेचे कर्तव्य ही त्यांच्या मनाची संकल्पना आहे. त्या 20 वर्षा पासू अंगणवाडी शिक्षिका म्हणून उत्तम उत्तम काम करत आहेत .सौ. सिमा मोहिते या अंगणवाडी शिक्षिका म्हणून काम करत असताना त्यांचा विद्यार्थीपट हा 25 ते 30 च्या दरम्यान आहे. खरे तर! आज मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांची पटसंख्या घटते आहे .परंतु योग्य शिक्षण, योग्य दिशा, आणि पालकांचा सहवास करून घेतला की ,विद्यार्थ्यांची संख्या वाढते. याचे आदर्श उदाहरण म्हणजे धामारी येथील अंगणवाडी आहे. सौ.सिमा मोहिते या विद्यार्थ्यांबरोबरच माता-भगिनींचे उपदेशन करतात .शिक्षण, आहार पोषण, प्राथमिक शिक्षण, गरोदर महिलांना बेबी किट, गरोदर मातांच्या वेळोवेळी बैठका घेऊन त्यांना बालसंगोपनाचे प्रशिक्षण देतातृ.मातृ वंदना महिलेची पहिली खेप असेल तर, त्या महिलेला घर खर्चासाठी रु 6000 हजार रुपये मिळवून देण्यात अग्रक्रमाने त्यांचे नाव घेतले जाते. "या अंगणवाडीत शिकणाऱ्या मुलांच्या कलागुणांचा विकास व्हावा त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळावा.!' यासाठी स्वतः त्या उत्तम गायन करून किंवा मुलांच्या कलेने त्यांना शिकवण्याचा सातत्याने त्या प्रयत्नशील असतात. सौ .सिमा मोहिते यांच्या या उत्तम कार्यामुळे धामारी गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य ग्रामपंचायत, वि. का. सोसायटी व इतरही संस्था आणि ग्रामस्थ या अंगणवाडीला मदत करतात. या त्यांच्या उत्तम कार्यामुळेच त्यांना यापूर्वी पंचायत समिती शिरुरने दोन वेळा आदर्श शिक्षिका व आदर्श अंगणवाडी म्हणून पुरस्कार देवून सन्मानित केले. तसेच महाराष्ट्रातील सामाजिक डी एस एस या संस्थेने सुद्धा त्यांचा सन्मान केलेला आहे. यावर्षी तर नुकताच वाई सातारा येथील उद्योग उत्कर्ष संस्थेने राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांना सन्मान करण्यात आले. त्यांच्या या कर्तृत्वाबद्दल त्यांचे जुन्नर ,आंबेगाव ,खेड तालुक्यातील सर्व विविध सामाजिक संस्थांच्यावतीने अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## खा. नीलेश लंके यांना डिस्चार्ज; मायबाप जनतेचे आशीर्वाद पाठीशी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : खासदार नीलेश लंके यांना गेल्या आठवड्यात विषाणूजन्य ताप व डिहायड्रेशनचा त्रास झाल्याने पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असताना त्यांच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा झाली असून बुधवारी सायंकाळी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. उपचारादरम्यान रूबी हॉल क्लिनिकच्या वैद्यकीय पथकाने सातत्याने त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवले. विविध वैद्यकीय तपासण्यांचे अहवाल सामान्य आल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना डिस्चार्ज देण्याचा निर्णय घेतला. डॉक्टरांनी काही दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असला तरी खासदार लंके यांनी गुरुवारपासून पुन्हा जनतेच्या सेवेत सक्रिय होणार असल्याचे सांगितले आहे. मंगळवारी सोशल मीडियावरून नागरिकांशी संवाद साधताना खासदार लंके म्हणाले की, “जनता हाच माझा ऑक्सिजन आहे. मायबाप जनतेचे आशीर्वाद माझ्या पाठीशी असताना मी पुन्हा जनतेच्या सेवेत रुजू होणार आहे. माझ्या प्रकृतीची चिंता करणाऱ्या सर्व नागरिकांचे, कार्यकर्त्यांचे आणि हितचिंतकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.” उपचारादरम्यान विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी रूबी हॉल क्लिनिक येथे भेट देऊन खासदार लंके यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच राज्यभरातून कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांच्या लवकर प्रकृती सुधारण्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. रुग्णालयातून डिस्चार्ज घेताना खासदार लंके यांनी त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर, परिचारिका तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे आभार मानत उपचारादरम्यान घेतलेल्या काळजीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## जिल्ह्यात कायमस्वरूपी कृती टीम स्थापनेचे आदेश

भिवंडी (स. गांवकरी) : अप्पर आयुक्त (महसूल) तथा पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष कोकण विभाग यांचेकडील आदेशाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी वर्षाचे ३६५ दिवस कायमस्वरूपी जलद कृती टीम स्थापन करण्याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त, ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, कल्याण डोंबिवली, भिवंडी व उल्हासनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, पोलीस आयुक्त ठाणे, कार्यकारी अभियंता, पीडब्ल्यूडी, सर्व तहसीलदार व सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती व्यवस्थापक, टोरेंट पॉवर लिमिटेड, उपनियमक, नागरी संरक्षण दल, ठाणे यांना आदेश निर्गमित केले आहेत. राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शहरी तथा ग्रामीण भागातील आगी, पावसाळी आपत्ती, नैसर्गिक व मानवनिर्मिती आपत्तीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २०४५ नुसार वर्षाचे ३६५ दिवस कायमस्वरूपी जलद कृती टीम स्थापन करण्याबाबत निवेदन सादर केले होते. त्यामुळे अध्यक्षांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## चेक बाऊन्स प्रकरणी कर्जदारास तीन महिन्यांची शिक्षा

**पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या दाव्यास न्यायालयाचा दुजोरा**

पारनेर (स. गांवकरी) : पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून वाहन तारणावर घेतलेल्या कर्जाची परतफेड न करता दिलेला धनादेश अनादरीत झाल्याप्रकरणी अहमदनगर येथील न्यायालयाने कर्जदार कैलास मारुती भोसले यांना तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच ९ लाख २७ हजार ४४९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी कैलास मारुती भोसले यांनी पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेकडून वाहन तारण कर्ज घेतले होते. संबंधित कर्जाच्या परतफेडीसाठी त्यांनी पतसंस्थेला धनादेश दिला होता. मात्र हा धनादेश बँकेत सादर केल्यानंतर अनादरीत झाला. त्यानंतरही आरोपीने कर्जाची रक्कम मुदतीत भरली नसल्याने पतसंस्थेने अहमदनगर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अंतर्गत एससीसी केस क्रमांक ६१२६/२०२४ दाखल केली होती. सदर प्रकरणाची गुणदोषांवर सुनावणी झाल्यानंतर माननीय न्यायाधीश जी. जी. सोनी यांनी आरोपी कैलास भोसले यांना दोषी ठरवत तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच फिर्यादी संस्थेस ९,२७,४४९ रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, निकालाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत नुकसानभरपाईची रक्कम न भरल्यास आरोपीस अतिरिक्त सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. या प्रकरणात फिर्यादी पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने ॲड. युवराज पाटील, ॲड. गणेश दरेकर यांनी कामकाज पाहिले.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/६२/२०२६ अकोले दि. १२/०५/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. मनिषा वनाभाऊ फलके, रा. ब्राम्हणवाडा,** ता. अकोले जि. अहिल्यानगर हल्ली रा.ओंकार वसाहत, मांडा टिटवळा वेस्ट, आंबिवली वसुंदरी, मांडा, कल्याण जि. ठाणे यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा स्वतः मनिषा वनाभाऊ फलके यांचा जन्म दि. १३/०८/१९७८ रोजी ब्राम्हणवाडा** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय ब्राम्हणवाडा** यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. मनिषा वनाभाऊ फलके, रा. ब्राम्हणवाडा,** ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वतः मनिषा वनाभाऊ फलके यांचा जन्म दि. ०२/०२/१९८८ रोजी अकोले** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद **ग्रामपंचायत कार्यालय ब्राम्हणवाडा** ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १२/०५/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,

कामगिरी क्लर्क

तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

# नाशिक येथे "महाराष्ट्र क्रीडा विकास प्रतिष्ठान" ची स्थापना

**महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेची स्थापना, रवींद्र नाईक**



निफाड : (स. गांवकरी)

नाशिक : खेळाडूंचा सर्वांगीण विकास आणि क्रीडा क्षेत्रातील विविध आव्हानांवर मात करण्यासाठी "महाराष्ट्र क्रीडा विकास प्रतिष्ठान" ही नवीन संस्था स्थापन करण्याबाबतचा महत्त्वपूर्ण विचार-विनिमय नाशिक येथे पार पडला.

सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांच्या पुढाकाराने हॉटेल रामा हेरिटेज येथे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ, मार्गदर्शक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून संस्थेच्या भविष्यातील वाटचालीवर चर्चा केली.

खेळाडूंना मिळणार हक्काचे व्यासपीठ "खेळ हेच साधना, यश हीच ओळख" हे ब्रीदवाक्य समोर ठेवून या प्रतिष्ठानच्या माध्यमातून राज्यातील खेळाडूंना विज्ञानावर आधारित प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील प्रतिभा शोधण्यावर (Talent Identification) संस्थेचा भर असेल, अशी माहिती रवींद्र नाईक यांनी दिली.

२२ सूत्री कार्यक्रमावर सविस्तर चर्चा : या बैठकीत संस्थेच्या कार्याची व्याप्ती स्पष्ट करण्यासाठी २२ मुख्य उद्दिष्टांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे.

प्रशिक्षण आणि साहित्य : खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण देणे, क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणे आणि दुखापतींनंतर पुनर्वसनासाठी (Rehabilitation) मदत करणे.

कौशल्य विकास : "स्किल इंडिया मिशन" आणि ""एनएसडीसी" च्या मान्यतेने खेळाडूंसाठी विविध कौशल्य विकास कोर्सेस आणि करिअर मार्गदर्शन केंद्र सुरू करणे.

पारंपरिक खेळांचे जतन : आधुनिक खेळासोबतच भारतीय पारंपरिक खेळांचा प्रचार आणि प्रसार करणे.

प्रसिद्धी आणि जनजागृती : पॉडकास्ट, यूट्यूब चॅनेल आणि कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून खेळाडूंना प्रसिद्धी मिळवून देणे.

शासकीय सहकार्य : शासनाच्या क्रीडा योजनांमध्ये सुधारणा सुचवणे आणि खेळाडूंचे अधिवेशन भरवून त्यांच्या अडीअडचणी सरकारपर्यंत पोहोचवणे.

मान्यवरांची उपस्थिती : या बैठकीला क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या बैठकीला क्रीडा समुपदेशक श्रीमती जयश्री खिलारी, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, शिव छत्रपती पुरस्कार विजेते अशोक दुधारे, शिव छत्रपती पुरस्कार विजेते आणि आंतरराष्ट्रीय कबड्डी कोच शैलजा जैन, खोखो क्रीडा संघटक श्री मंदार देशमुख, शिव छत्रपती पुरस्कार विजेते आनंद खरे, आंतरराष्ट्रीय धावपटू मोनिका अथरे, प्रा हेमंत पाटील, रिटायर्ड विंग कमांडर प्रदीप बागमार, प्रा. दीपक जुंद्रे, बॅडमिंटन कोच मकरंद देव, डॉ दिपक क्षत्रिय, हेमंत काळे, फिजिओथेरपीस्ट डॉ. नील शहा, ॲथलेटिक्स कोच सिद्धार्थ वाघ, बॅडमिंटन संघटक अनंत जोशी, विलास गायकवाड, आदिवासी विकास विभागाच्या जयश्री जेजुरकर, क्रीडा पत्रकार फणींद्र मंडलिक, माजी अधिक्षक, जिल्हा न्यायालय दीपक मोरवाल, प्रा हेमंत काळे, आदिवासी क्षेत्रात क्रीडा मार्गदर्शक दिनेश पागी, इंजी. नरेंद्र बिरार, अंकिता धेरमले, उपप्राचार्य आणि कौन्सेलर संगीता पवार, सायक्लिस्ट स्नेहल देव, अधीक्षक आदिवासी विकास विभाग अरुण बगले, हिरामण टोपले, आदिवासी भागात खेळाडू कार्यकर्ता संजय गवळी, विशाल भुसारे, श्री भूषण पाटील, कामिनी केवट, सुनील गायकवाड, इंज श्री विजय खटोड, तालुका क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, आंतरराष्ट्रीय डिफ क्रिकेटर सुदिश नायर, बास्केटबॉल खेळाडू दीपशिखा रे आदी प्रतिनिधींनी या मोहिमेत सहभाग दर्शवला आहे.

# भव्य दिव्य वारकरी बाल संस्कार प्रशिक्षण शिबिर उत्साहात!




**गायन, वादन, हरिपाठ, ज्ञानेश्वरी पाठासह वारकरी संस्कारांचे दिले जाणार प्रशिक्षण!**

वसमत : (स. गांवकरी)

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील श्री गोरक्षनाथ संस्थान, गोरक्षनाथ वाई येथे दि. १ मे २०२६ पासून भव्य दिव्य वारकरी बाल संस्कार प्रशिक्षण शिबिरास उत्साहात प्रारंभ झाला आहे. दि. १५ मे २०२६ रोजी या शिबिराची सांगता होणार असून वारकरी संप्रदायातील विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक विषयांचे प्रशिक्षण या शिबिरामध्ये दिले जात आहे. या शिबिरासाठी गुरुवर्य नामदेवजी बाबा चारठाणकर व गुरुवर्य नरेशजी बाबा ठाकरे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. तसेच सांगता समारंभासाठी मा. श्री. नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांचेही विशेष सहकार्य मिळत आहे. शिबिरामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना गायन, वादन, गीतापाठ, हरिपाठ, ज्ञानेश्वरी पाठ यांसारख्या विषयांचे सखोल प्रशिक्षण दिले जात असून लहान मुलांमध्ये वारकरी संस्कार, भक्तिभाव आणि अध्यात्मिक जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्व. ठक्कर धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठाणावाला यांच्या स्मरणार्थ आयोजित या शिबिरामध्ये राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे विविध भागांतून वारकरी बांधव व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

# आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन २०२६ उत्साहात साजरा



भोसरी : (स. गांवकरी)

मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी येथे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन २०२६ मोठ्या उत्साहात आणि कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला. रुग्णसेवा, आपत्कालीन वैद्यकीय मदत आणि आरोग्य व्यवस्थेमध्ये परिचारिकांचे योगदान अधोरेखित करत त्यांच्या समर्पणाचा गौरव करण्यात आला.

“आवर नर्सेस, आवर फ्युचर – एम्पॉवर्ड नर्सेस सेव्ह लाइव्ह्स” या प्रेरणादायी संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन हॉस्पिटलच्या चौथ्या मजल्यावरील सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मान्यवर पाहुणे, हॉस्पिटल व्यवस्थापन, डॉक्टर्स, परिचारिका कर्मचारी आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका नम्रताताई लोंढे उपस्थित होत्या, तर प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. कीर्ती माने यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविली. यावेळी डॉ. पवन वाखरे, डॉ. श्रीरंग कुलकर्णी, डॉ. वर्षा रांगेरी आणि डॉ. दत्तात्रय कुलकर्णी हे मान्यवरही उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना गीत, स्वागतपर भाषण आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर विविध मान्यवरांनी परिचारिकांच्या अथक सेवाभावाचे कौतुक करत आरोग्य व्यवस्थेमध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले. रुग्णांच्या उपचारांबरोबरच मानसिक आधार देण्यातही परिचारिका महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले. मान्यवरांनी मेडिकव्हर हॉस्पिटलच्या परिचारिका टीमचे विशेष कौतुक करत रुग्णसेवेतील उच्च दर्जा, संवेदनशीलता आणि सेवाभाव यांचे अभिनंदन केले. कुशल आणि सक्षम परिचारिका आरोग्यसेवेचे भविष्य अधिक मजबूत बनवतात, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. या कार्यक्रमात सांस्कृतिक सादरीकरणे, मान्यवरांची भाषणे, विविध स्पर्धा, बक्षीस वितरण, केक कटिंग समारंभ आणि परिचारिका कर्मचाऱ्यांसाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण वातावरण आनंद, उत्साह आणि गौरवाच्या भावनेने भारावून गेले होते.

कार्यक्रमाचे नियोजन आणि समन्वय नर्सिंग विभाग प्रमुख रत्ना माद्याळ आणि मानव संसाधन विभाग प्रमुख रोहन सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

यावेळी हॉस्पिटल व्यवस्थापनाने सर्व परिचारिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत, “मानवतेच्या सेवेसाठी परिचारिकांचे योगदान अमूल्य असून त्यांच्या समर्पणामुळेच अनेक रुग्णांना नवजीवन मिळते,” असे सांगितले. आभार प्रदर्शनानंतर सर्व उपस्थितांसाठी भोजनाचे आयोजन करण्यात आले. मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरीने परिचारिका व्यावसायिकांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली.

# हरिश्चंद्र मेडिकल फाऊंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, अकोले येथे आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहात साजरा!

**“सेवा, समर्पण आणि माणुसकीचा खरा चेहरा म्हणजे नर्स” — परिचारिकांच्या कार्याला मानाचा मुजरा!**



अकोले : (स. गांवकरी)

अकोले येथील हरिश्चंद्र मेडिकल फाऊंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरमध्ये दि. १२ मे २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. रुग्णसेवेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या परिचारिकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने व मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. प्राध्यापक पंकज प्रधान यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी आधुनिक परिचर्या सेवेच्या जननी फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे चेअरमन डॉ. भांडकोळी सर, सेक्रेटरी डॉ. ज्योती भांडकोळी मॅडम, कॉलेजच्या प्रा. कविता माने मॅडम, उपप्राचार्य किर्ती गंधले तसेच शिक्षकवृंद प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान कॉलेजमध्ये डिजिटल बोर्डचे उद्घाटन करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांसाठी आकर्षक रांगोळी स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी परिचारिकांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करताना सांगितले की, “रुग्णांच्या वेदनेत आधार देणारे हात, आशेचा किरण बनून प्रत्येक जीवाला नवसंजीवनी देणारे देवदूत म्हणजे आपल्या नर्सेस होत.” समाजातील आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या परिचारिका संकटाच्या काळातही निस्वार्थपणे सेवा बजावत असल्याचे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले.

जागतिक परिचारिका दिन हा दरवर्षी १२ मे रोजी फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो. रुग्णांच्या सेवेसाठी रात्रंदिवस कार्य करणाऱ्या परिचारिकांच्या अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे.

यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनाची थीम — “Our Nurses, Our Future : Empowered Nurses Save Lives” — अशी असून सक्षम परिचारिका समाजाचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, हा संदेश यानिमित्त देण्यात आला.



# उन्हाच्या तिव्रतेने चप्पल बुट वाटप

रावेर : (स. गांवकरी)

सध्या वाढत्या उन्हामुळे लहान मुलांना होणारा त्रास लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत मा. श्री. विनोद रामचंद्र कोळी (शिवा भाई G), महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य कार्यकारणी सदस्य तथा उत्तर महाराष्ट्र संघटक व दैनिक लोकशाही प्रतिनिधी यांच्या हस्ते लहान मुलांना चप्पल वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी चि. तुषार रामचंद्र कोळी, खान्देशचे ब्लॉगर तथा संचालक श्रद्धा सबुरी बुट हाऊस, एम. जे. मार्केट, बस स्टँड समोर, रावेर यांचे विशेष सहकार्य लाभले. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने अनेक लहान मुले अनवाणी फिरताना दिसत असून त्यांना दिलासा मिळावा या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या चप्पल वाटप उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत असून सामाजिक जाणीव जपणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. यावेळी नितीन भवर, विजय सोनार, कौशल पाटील, धनराज कोळी, हर्षल कोळी आदी उपस्थित होते.

# तहसीलदारांना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे निवेदन

## वस्तूंच्या एमआरपी (MRP) सोबत 'उत्पादन खर्च' छापण्याच्या मागणीसाठी देशव्यापी एल्गार

**२५ मे रोजी दिल्लीत जंतर-मंतरवर धडकणार मोर्चा**



अकोले : (स. गांवकरी)

उत्पादन खर्चापेक्षा अनेक पटीने जास्त छापील किंमत (MRP) लावून कंपन्यांकडून सुरू असलेली ग्राहकांची उघड लूट थांबवण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत आता राष्ट्रीय स्तरावर आक्रमक झाली आहे. या मागणीसाठी येत्या २५ मे रोजी दिल्लीतील ऐतिहासिक जंतर-मंतर येथे भव्य राष्ट्रीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाचा भाग म्हणून आणि केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आज अकोलेचे नायब तहसीलदार लोहरे यांना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने सविस्तर निवेदन देण्यात आले. काय आहे निवेदनातील मुख्य विषय?सध्या बाजारपेठेत कोणत्याही वस्तूवर केवळ तिची अंतिम विक्री किंमत (MRP) छापलेली असते. मात्र, ती वस्तू तयार करण्यासाठी प्रत्यक्ष खर्च किती आला, हे ग्राहकांपासून लपवले जाते. याचाच फायदा घेऊन अनेक कंपन्या अवाच्या सवा नफेखोरी करतात. ही लूट थांबवण्यासाठी "प्रत्येक वस्तूवर एमआरपीसोबतच तिचा 'उत्पादन खर्च' (Cost of Production) छापणे अनिवार्य करावे," अशी ऐतिहासिक मागणी संघटनेने केली आहे.

जंतर-मंतरवरून पेटणार आंदोलनाची ठिणगी येत्या २५ मे रोजी संपूर्ण देशभरातून ग्राहक प्रतिनिधी दिल्लीत एकत्र येणार आहेत. जंतर-मंतर येथील मोर्चाद्वारे सरकारवर दबाव निर्माण करून वस्तूंच्या किमतीबाबत पारदर्शक कायदा करण्याची मागणी केली जाणार आहे. अकोले तालुका शाखेने या लढ्यात सक्रिय सहभाग नोंदवत तालुका प्रशासनाद्वारे आपला आवाज केंद्र सरकारपर्यंत पोहोचवला आहे.

"ग्राहकांची लूट थांबलीच पाहिजे!" "वस्तूच्या किमतीमधील पारदर्शकता हा ग्राहकाचा मूलभूत अधिकार आहे. उत्पादन खर्च समोर आल्याशिवाय ही मनमानी नफेखोरी थांबणार नाही. २५ मे रोजी दिल्लीत होणारा मोर्चा हा या संघर्षाचा निर्णायक टप्पा असेल," अशी भावना जिल्हा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. जिल्हाधिकाऱ्यांनी या निवेदनाची गंभीर दखल घेऊन ते केंद्र सरकारकडे त्वरित पाठवण्याचे आश्वासन दिले आहे. या आंदोलनामुळे आता एमआरपीच्या नावाखाली होणाऱ्या लुटीविरोधात मोठी जनचळवळ उभी राहत आहे.

11 मे रोजी जिल्हयात सर्व तालुक्यात तालुका पदाधिकारी यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन MRP कायद्यात सुधारणा करण्याची मागणी केली.

नायब तहसीलदार लोहरे यांची भेट घेऊन निवेदन देताना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे अकोले तालुका अध्यक्ष अशोकराव उगले,जिल्हा सचिव दिनेश थोरात,तालुका उपाध्यक्ष हरिभाऊ फापाळे, सदस्य संदीप उगले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# ॲड. अच्युत सदाशिव पिंगळे यांचा सहस्त्रचंद्रदर्शन गौरव सोहळा व "समर्पित" गौरवांकाचे प्रकाशन

- हिंदू राष्ट्र व राम राज्याचा जाहीरनामा म्हणजे पसायदान
- स्वामी स्वामी गोविंददेव गिरी यांचे स्पष्टीकरण,देश तोडण्याचे षडयंत्र सुरू असल्याचा दावा




अहिल्यानगर : (स. गांवकरी)

तब्बल आठशे वर्षानंतर वंगभूमी (पश्चिम बंगाल) स्वतंत्र झाला आहे. तेथे भाजपचा नाहीतर हिंदुत्वाचा विजय झाला आहे. राम राज्य स्थापनेच्या दिशेने हे पाऊल आहे. हिंदू राष्ट्र व राम राज्याचा जाहीरनामा ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान आहे व त्यातील विवेचन ही हिंदुत्ववाद्यांची प्रेरणा आहे, असे प्रतिपादन श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी यांनी मंगळवारी येथे केले. देशाला फुटीचे ग्रहण लागले आहे. प्रांत, भाषा, जाती, संप्रदाय असे भेद करून देशाला तोडण्याचे षडयंत्र दीडशे वर्षापासून सुरू आहे. भारत तेरे टूकडे होंगे अशी भाषा यातूनच येते. त्यामुळेच भारताचे अस्तित्व व सनातन धर्म रक्षणाचे कर्तव्य प्रत्येकाचे आहे, असेही आवाहन त्यांनी केले. अहिल्यानगर येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. अच्युतराव सदाशिव पिंगळे यांचा सहस्र चंद्रदर्शन गौरव सोहळा व त्यांच्या जीवनावरील समर्पित गौरव अंकाचे प्रकाशन येथील माऊली सभागृहात स्वामी गोविंददेव गिरी यांच्या हस्ते झाले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, राज्यसभा खासदार व विशेष सरकारी वकील ॲड.उज्वल निकम,महापौर ज्योती गाडे,सौ. पिंगळे,माजी आमदार चंद्रशेखर कदम,आचार्य महेश व्यास,मोहन बुवा रामदासी, गौरव समितीचे अध्यक्ष ॲड.विश्वासराव आठरे, स्वागताध्यक्ष वसंत लोढा, उपाध्यक्ष प्रा.भानुदास बेरड,डी.एम.कुलकर्णी,राजेंद्र गांधी,राजेंद्र चोपडा,राजेंद्र काळे आदी उपस्थित होते. स्वामी गोविंददेव गिरी हे मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील बेलापूर येथील आहेत. या पार्श्वभूमीवर आणीबाणी व त्यापूर्वीच्या जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक स्थितीवर त्यांनी भाषणात परखड भाष्य केले. दत्ताजी भाले, दामू अण्णा दाते, दत्तोपंत ठेंगडी आदी संघ स्वयंसेवकांच्या संघर्ष व संघ कार्याच्या आठवणींना उजाळा देताना ते म्हणाले, त्या काळात जिल्ह्यात भयंकर स्थिती होती. लाल बावटाची दहशत होती. आणीबाणीत १९ महिने अनेक जण कारागृहात होते. त्यांच्या आयुष्याची वाताहत व्हावी अशी व्यवस्था केली गेली होती. बलिदान वा सती जाणे एकदाच होते, परंतु वारंवार होणारा अपमान व दिल्या जाणाऱ्या त्रासामुळे संघ सेवकांना रोज बलिदानाला सामोरे जात सती जावे लागत होते. अशा सगळ्या पार्श्वभूमीवर ध्येयप्रेरित आपल्या मार्गावर चालत राहतात व म्हणून मोठे होतात.त्यामुळे संघर्षमय जीवन अनुभवलेल्या ॲड.पिंगळे यांचा सत्कार हा तपस्वी जीवन कृतज्ञतेची पावती आहे.असे गौरव उद्गार स्वामी गोविंद देवगिरी यांनी व्यक्त केले. अयोध्यामध्ये राम लल्लाचे मंदिर झाल्याने आता देशाला खरे स्वातंत्र्य मिळाले आहे. संघ कार्य व भाजपचा आता वटवृक्ष झाला असला तरी अच्युतराव पिंगळे यांच्यासारख्या अनेक पारंब्यांनी स्वतःला गाडून घेतले व देशासाठी जीवन समर्पित केल्याने देशात व राज्यात भाजप सरकार आले, असे प्रतिपादन सभापती प्रा. शिंदे यांनी केले. मेहनत, जिद्द व विचारांशी तडजोड न करणाऱ्या ध्येयनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ व्यक्तींचे जीवन समाजासाठी नेहमी प्रेरणादायी असते,असेही त्यांनी स्पष्ट केले. सामान्य माणसासाठीची तळमळ ही आता गुलबाकावलीच्या फुलासारखी दुर्मिळ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयुष्यभर सामान्य व्यक्तींचे हीत जपणारे ॲड.पिंगळे यांचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे, असे गौरवोद्गार व्यक्त करून ॲड.निकम म्हणाले, अहिल्यानगर शहराचा व जिल्ह्याचा इतिहास ॲड. पिंगळे यांच्याकडून मी जाणून घेणार आहे.

## थोडक्यात बातम्या...




### समर्थ आयटीआय बेल्हेतील ४६ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

बेल्हे (स. गांवकरी) : जुन्नर समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ आयटीआय, बेल्हे येथे एसपीएम ऑटो कॉम्प प्रा.लि. कंपनी, रांजणगाव, पुणे यांच्या वतीने आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये ४६ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विविध ट्रेडमधील विद्यार्थ्यांनी या मुलाखतीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्लांट एचआर हेड सिद्धेश्वर बोगडे यांनी निवड प्रक्रियेची माहिती दिली. या कॅम्पस ड्राइव्हमध्ये ड्राफ्ट्समन मेकॅनिकल, फिटर, मेकॅनिकल डिझेल, मेकॅनिक मोटार व्हेईकल, मेकॅनिक ट्रॅक्टर तसेच कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट (COPA) या ट्रेडमधील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली प्लेसमेंट प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी विकास कणसे, मनोज निमसे, आकाश जेजुरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, समर्थ आयटीआयचे प्राचार्य पांडुरंग हाडवळे, उपप्राचार्य विष्णू मापारी, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, सर्व विभागांचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### रोटरीच्या सामाजिक कार्याला नवी दिशा; रवींद्र बोरसे सहप्रांतपाल पदी नियुक्त

कळवण (स. गांवकरी) : रोटरीच्या माध्यमातून समाजसेवा, शिक्षण, आरोग्य आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सातत्याने योगदान देणारे रवींद्र बोरसे (RB) यांची Rotary International अंतर्गत Rotary District 3030 च्या सहप्रांतपाल पदी नियुक्ती झाल्याने सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या नियुक्तीनंतर त्यांना फोन, संदेश आणि प्रत्यक्ष भेटीद्वारे शुभेच्छा देणाऱ्या सर्वांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत. “आपण दिलेल्या शुभेच्छांमुळे मनस्वी आनंद झाला असून, तुमच्या प्रेमाची आणि विश्वासाची ऊर्जा रोटरीच्या सामाजिक कार्यासाठी अधिक प्रेरणादायी ठरणार आहे,” अशी भावना रवींद्र बोरसे यांनी व्यक्त केली. रोटरी ही केवळ संस्था नसून समाज परिवर्तनाची चळवळ आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, युवक विकास आणि गरजूंना मदत अशा विविध क्षेत्रांत रोटरीचे कार्य प्रभावीपणे सुरू असते. या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सर्वांनी निःस्वार्थ भावनेने सहकार्य करावे, असे आवाहनही बोरसे यांनी केले. “हे राष्ट्र अधिक सशक्त, सुसंस्कारी, सुशिक्षित आणि विकसित करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने सामाजिक जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. आपण कायम प्रेम, आशीर्वाद आणि सहकार्य असेच ठेवा.

### कडूबाई खरात यांच्या भीम गीतांने दुमदूमली बिलोली नगरी

बिलोली (स. गांवकरी) : बिलोली शहरात बुद्ध व भीम जयंतीनिमित्त दि. १२ मे सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका कडूबाई खरात यांच्या "भीमानं माय सोन्यानं भरली ओटी", "तुम्ही खाता त्या भाकरीवर", "कुंकू लाविलं रमानं" आदी बहारदार गीताने बिलोली नगरी दुमदूमली आहे, या कार्यक्रमास अक्षरशः तालुक्यातून भीम सागरच उसळे होते. शहरातील आंबेडकर नगर जयंती मंडळाच्या वतीने बुद्ध, भीम जयंती निमित्ताने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे महाराष्ट्राच्या प्रसिद्ध गायिका कडूबाई खरात यांच्या भीम गीतांच्या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे उद्घघाटन माजी नगराध्यक्षा मैथली कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले तर सुरेशदादा गायकवाड यांनी मार्गदर्शन केले, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी.एल.एम. जाधव हे होते.यावेळी अनुप अंकुशकर उपाध्यक्ष न.प. बिलोली, नगरसेविका आम्रपाली पोवाडे,अनुपमा गायकवाड, नगरसेवक संदिप कटारे, राजू कुडके, शिवाजी गायकवाड, विना जाधव माजी न.प अध्यक्ष, विमलबाई जाधव, लताबाई जाधव, रेखाबाई पोवाडे यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आंबेडकर नगर भीम जयंती मंडळ तसेच पत्रकार तथा नगरसेवक प्रकाश पोवाडे, रत्नाकर जाधव, संजय जाधव,धम्मपाल जाधव, शिलरत्न जाधव, प्रदीप पोवाडे, हंसराज जाधव,विकास जाधव, रमेश पोवाडे, संघपाल जाधव, आशिष जाधव, प्रशांत जाधव यांनी परिश्रम घेतला आहे.

### रिजनल मॅनेजरचे अपहरण करून मारहाण

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सावेडी परिसरात एका खासगी फायनान्स कंपनीच्या रिजनल मॅनेजरला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून निर्जन ठिकाणी नेऊन लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी माजी शाखा व्यवस्थापकासह त्याच्या साथीदारांविरूध्द सोमवारी (११ मे) तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोशन हरीराम तिडके (वय ३६, रा. सध्या चंदननगर, नागपूर, मुळ रा. गोंदिया) यांनी फिर्याद दिली आहे. सदरची घटना ९ मे रोजी दुपारी घडली आहे. रोशन तिडके हे बेरार फायनान्स लिमिटेड या रिझर्व्ह बँक मान्यताप्राप्त एनबीएफसी कंपनीमध्ये रिजनल मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. कंपनीचे मुख्य कार्यालय नागपूर येथे असून अहिल्यानगर येथे शाखा कार्यरत आहे.

## महालक्ष्मी विद्यालयाचे एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत नेत्रदिपक यश

### पवन आढळ याने ८९.६० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळविला

राजूर : (स. गांवकरी)






अकोले तालुक्यातील अगस्ती रूरल एज्युकेशन सोसायटीचे महालक्ष्मी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळगाव नाकविंदा या विद्यालयाने एस.एस. सी.बोर्ड परीक्षेत नेत्रदिपक यश संपादन केले आहे.

बोर्ड परीक्षा पुणे विभागीय मंडळाने एस.एस.सी. बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन प्रसिद्ध केला आहे.या परीक्षेत महालक्ष्मी विद्यालयाचा शेकडा निकाल ९६.१६ % इतका लागला असून चि.आढळ पवन दगडू याने ८९.६०% गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान पटकविला आहे. त्याचप्रमाणे चि.वाळकुळे दत्ता ज्ञानेश्वर याने ८१% गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला तर कु. कासार गौरी प्रकाश हिने ७८.२०% गुण प्राप्त करत तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच कु. मेंगाळ कांचन सोमनाथ हिने ७६% गुण प्राप्त करून चतुर्थ क्रमांक मिळविला.

परिक्षेस एकूण ५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.यापैकी ४ विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणी संपादन केली असून १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.तर २१ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तसेच १२ विद्यार्थ्यांनी तृतीय श्रेणी संपादन केली आहे.

गुणवत्तेच्या यादीत विद्यालयाने नेहमीच आपली मान उंच ठेवली आहे. या नेत्रदिपक यशामुळे गुणवत्त विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सर्व परिक्षार्थी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य सुनिल धुमाळ, रामदास कासार,अनिल चासकर, विठ्ठल आभाळे, तुकाराम भोर, आण्णासाहेब ढगे, संकेत येलमामे, महेश खांडरे आदी गुरूजनांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

मार्गदर्शक शिक्षक तसेच गुणवंत्त विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर, सचिव मंगेशराव नवले, ग्रामपंचायतीचे सरपंच लक्ष्मण सोंगाळ, उपसरपंच मारूती काळे, माजी सरपंच तथा तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बबन आभाळे,सदस्य नवनाथ जाधव तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य,पोलीस पाटील चंद्रभान लगड,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मारूती आभाळे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भाऊसाहेब लगड यांसह सर्व माजी विद्यार्थी व पालक आदींनी अभिनंदन केले आहे.

> गुणवत्ता ही देणगी नसून प्रयत्नांचे फळ आहे.मानवी आयुष्यात ज्ञानाला पायाभूत मानून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढावी आणि टिकावी यासाठी विद्यालय नेहमीच प्रयत्नशील आहे. विद्यालयाने बोर्ड परिक्षेत मिळविलेले यश निश्चितच प्रेणादायी आहे.
> - ॲड. वसंतराव मनकर

## अहिल्यानगर येथून एक जण ताब्यात, चौकशी सुरू

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

**NEET2026 पेपरफुटी प्रकरण**

सरकारने NEET UG 2026 परीक्षा रद्द केली असून याचा तपास आता CBI कडे सोपवण्यात आला आहे. पण, ‘नीट’चा पेपर नेमका फुटला कसा? याबद्दलची धक्कादायक माहिती आता समोर येऊ लागली आहे. या प्रकरणात पोलिसांनी नाशिकमधील एका आरोपीला ताब्यात घेतले होते. त्याच्या चौकशीत त्याला मदत करणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील साथीदाराचे नाव धनंजय लोखंडे असल्याचे समोर आले होते. धनंजय हा पुणे जिल्ह्यात काम करत असला तरी त्याचे मूळ गाव अहिल्यानगर जिल्ह्यातील आहे. त्याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने काल(दि. १३) रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातून ताब्यात घेतल्याचे समजते. धनंजय लोखंडे हा राहुरी तालुक्यातील रहिवासी असल्याचे समजते. सीबीआयचे पथक आज पहाटे अहिल्यानगर शहरात दाखल झाले. त्यांनी धनंजय लोखंडेचा तपास करत त्याला ताब्यात घेतले. त्याला पुढील तपासासाठी पुण्यात नेण्यात आल्याची माहिती विश्वसनिय सूत्रांकडून समजते. तो पुण्यामध्ये कामाला होता. मात्र त्याचं मुळ गाव हे अहिल्यानगरचं असल्याने त्याला तेथून ताब्यात घेण्यात आलं आहे. या पेपरफुटीचा उगम आणि प्रसार नाशिकमधून सुरू झाल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणात ३० वर्षीय शुभम खैरनार या संशयित आरोपीला इंदिरानगर भागातून त्याला अटक करण्यात आली आहे.

## डांगमध्ये सरकारी पायलट वाहनाच्या वापराची चर्चा

डांग. गुजरात : (स. गांवकरी)



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक परिस्थिती आणि ऊर्जा संकट लक्षात घेऊन देशवासीयांना आवश्यक तेवढ्याच इंधन व गॅसचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. देशातील अनेक उच्च पदाधिकारीही हा संदेश गांभीर्याने घेत मितव्ययी भूमिका स्वीकारताना दिसत आहेत.

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत तसेच केंद्रीय जलशक्ती मंत्री सी,आर, पाटील आणि आरोग्य मंत्री ऋषीकेश पटेल यांनी पायलट आणि एस्कॉर्ट वाहनांचा त्याग करून साध्या पद्धतीने प्रवास करण्याची घेतलेली भूमिका देशासाठी सकारात्मक संदेश मानली जात आहे.मात्र दुसरीकडे राज्यातील शांत आदिवासी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डांगमध्ये वेगळीच परिस्थिती दिसून येत असल्याची चर्चा सुरू आहे. डांगचे आमदार आणि नायब मुख्य दंडक विजय पटेल हे सरकारी पायलट वाहनासह आपल्या इनोव्हा कारमधून सतत फिरताना दिसत असल्याचे दृश्य सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. एकीकडे देशाचे पंतप्रधान इंधन बचतीचे आवाहन करत असताना दुसरीकडे निवडून आलेल्या प्रतिनिधींमार्फत सरकारी साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असेल, तर सामान्य नागरिकांमध्ये प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक असल्याचे बोलले जात आहे. “पंतप्रधानांचे आवाहन फक्त सामान्य जनतेसाठीच आहे का? तसेच “लोकप्रतिनिधींसाठी वेगळे निकष आहेत का?” असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.डांगसारख्या शांत जिल्ह्यात सतत पायलट वाहनासह फिरण्याची नेमकी किती आवश्यकता आहे, याबाबतही चर्चा रंगू लागली आहे. देश आर्थिक आव्हाने, इंधन बचत आणि खर्च कपात याकडे वाटचाल करत असताना जनप्रतिनिधींनीही साधेपणा, पारदर्शकता आणि जबाबदारीचे उदाहरण समाजासमोर ठेवावे, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

### प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत

## सोयाबीन पिकासाठी ८८४.७२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर; ४९९.६० कोटी वितरित

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

प्रधानमंत्री पीक विमा योजना (पीएमएफबीवाय) अंतर्गत खरीप हंगाम 2025-26 मध्ये सोयाबीन पिकाच्या नुकसानीसाठी नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एकूण ८८४.७२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व ९३ महसूल मंडळे पात्र ठरली असून ६ लाख ३४ हजार ६२३ शेतकरी अर्जदारांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. सुमारे ४,४४,८७९.३७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आले होते.

दिनांक ७ मे २०२६ पर्यंतच्या अहवालानुसार सोयाबीन पिकासाठी एकूण ८८४.७२ कोटी रुपये नुकसानभरपाई निश्चित झाली असून त्यापैकी ४९९.६० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत आणि ३८५.११ कोटी रुपये प्रलंबित आहेत. विमा कंपनीच्या अद्ययावत माहितीनुसार सोयाबीन, मुग, उडीद, तूर आणि ख.ज्वारी या पिकाच्या नुकसानभरपाईसाठी मंजूर रक्कम ८८८.६७ कोटी रुपये असून त्यापैकी ५०२ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. उर्वरित रक्कम राज्य शासनाकडून विमा कंपनीला प्राप्त झाल्यानंतर तात्काळ वितरित करण्यात येणार आहे. नुकसानभरपाई निश्चिती प्रक्रियेत असलेली १३ महसूल मंडळे:

दिग्रस (बु.), कंधार, इस्लापूर, जलधारा, मांडवी, सिंदगी (मो.), माहूर, सिंदखेड, वाई बाजार, वानोळा, बारड, धानोरा (बु.), नांदेड (शहर).

राज्य शासनाचा हिस्सा प्रलंबित असलेली प्रमुख महसूल मंडळे : मालेगाव (अर्धापूर), भोकर, भोसी, किनी, बिलोली, कुंडलवाडी, देगलूर, खानापूर, मरखेल, धर्माबाद, करखेली, सिरजखोड, निवघा, तळणी, तामसा, जवळगाव, कुरुळा, उस्माननगर, फुलवल, बोधडी, किनवट, उमरी बाजार, सावरगाव नसरत, शेवडी (बा.), सोनखेड, मुदखेड, अंबुलगा (बु.), जांब, मुखेड, मुक्रमाबाद, बरबडा, घुंगराळा, नरसी, नांदेड (ग्रामीण), तरोडा (बु.), वसरणी, विष्णुपुरी, वाजेगाव आणि सिंधी. दि. २४ जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे सदरची योजना ही एकूण १२ जिल्हा समुहासाठी निवडलेल्या पीक विमा कंपन्यांमार्फत सन २०२५-२६ या एक वर्षाकरिता ८०:११० कप व कॅप मॉडेलनुसार राबविण्यात येत आहे. त्यामध्ये नुकसान भरपाईचे दायित्व संबंधीत विमा कंपनीवर राहणार आहे.

> विमा कंपन्या एका हंगामामध्ये जिल्हा समूहातील एकूण जमा विमा हप्ता रक्कमेच्या ११० टक्के किंवा एकूण विमा संरक्षित रकमेवर बर्न कॉस्ट (Burn Cost) नुसार येणाऱ्या विमा हप्त्याच्या ११० टक्के यापैकी जे जास्त असेल, त्यापर्यंतचे दायित्व स्विकारतील व यापुढील दायित्व राज्य शासन स्विकारेल आणि जर देय पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम जिल्हा समूहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकमेपेक्षा कमी असेल तर विमा कंपनी जमा विमा हप्ता रक्कमेच्या जास्तीत जास्त २० टक्के रक्कम स्वतःकडे ठेवेल व उर्वरीत विमा हप्ता रक्कम राज्य शासनाला विहित वेळेत परत करेल. यानुसार नांदेड जिल्ह्यातील नुकसानभरपाई ११० टक्के पेक्षा जास्त होत असून राज्य शासनाकडून उर्वरित निधी विमा कंपनीला प्राप्त होताच सर्व पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसानभरपाईची रक्कम थेट जमा करण्यात येईल. त्यामुळे सर्व सोयाबीन पिक विमा धारक शेतकऱ्यांनी आपले बँक खाते, आधार लिंक माहिती अद्ययावत ठेवावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांची अर्धापूर तहसील कार्यालयास भेट

**कामकाजाची केली पाहणी**

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सोमवारी (दि. 12 मे) अर्धापूर तहसील कार्यालयास अचानक भेट देत विविध विभागांच्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी महसूल विभागासह पंचायत समिती, गट विकास अधिकारी कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, रोजगार हमी योजना विभाग, पुरवठा विभाग, उपकोषागार कार्यालय आणि भूमि अभिलेख कार्यालयाला भेटी देऊन कामकाजाचा आढावा घेतला. तहसील कार्यालयात त्यांनी महसूल विभागातील सर्व कार्यासनांना भेट देत प्रत्येक विभागाच्या जाबचार्टची तपासणी केली. तसेच ‘आरटीएस’ अंतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची पडताळणी करून प्रलंबित प्रकरणे नसल्याची खात्री केली. अभिलेख कक्षालाही भेट देऊन अभिलेखांच्या नक्कल वितरण प्रक्रियेची पाहणी केली व कामकाज अधिक सुलभ आणि प्रभावी करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी तहसील कार्यालयाच्या सभागृहात शासकीय जमिनींच्या अभिलेख पडताळणीसाठी विशेष शिबिर सुरू होते. नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि कर्मचारी विविध गटांच्या नोंदींची पडताळणी करत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाचा आढावा घेत उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच तहसील कार्यालयाच्या एकूण कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यानंतर पंचायत समिती कार्यालयात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनांची माहिती घेतली. शासकीय जमिनींवर निवासी प्रयोजनासाठी झालेल्या अतिक्रमणांच्या याद्या तयार करण्यात आल्या आहेत का, याबाबतही त्यांनी विचारणा केली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) विभागाच्या कामांची माहिती घेऊन अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

याशिवाय उपकोषागार कार्यालय, भूमि अभिलेख कार्यालय आणि पुरवठा विभागाचीही पाहणी करण्यात आली.

पुरवठा विभागाकडून इष्टांकासंदर्भातील माहिती घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या. या पाहणी दौऱ्यावेळी तहसीलदार रेणूकादास देवणीकर, नायब तहसीलदार राजेंद्र शिंदे, आश्विनी केंद्रे, अव्वल कारकून विश्वंभर सोळंके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)